**फौजदारी चौकशी अर्ज क्र.९०/२०२६ मधील निशाणी क्र.१ वरील आदेश**
(रमेश आनंद गोसावी **विरुध्द** महाराष्ट्र सरकार व इतर)
(संगणकीकृत नोंदणी क्र.एम.एच.ए.एच.०६-०००३०६-२०२६)

अर्जदार नामे रमेश आनंद गोसावी, यांनी सदरचा अर्ज भारतीय न्याय सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ५०३ अन्वये श्रीरामपुर शहर पोलिस स्टेशन येथील गु.र.नं.१०७/२०२६ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम, १९७६ चे कलम ५, ५(ब), ९, ११(च), ११(ज), ११(छ), अन्वये दाखल असलेल्या गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल – आठ पांढ–या रंगाचे गावरान बैल व एक काळया व तांबडया रंगाचे गावराण दुभती गाय, असे एकुण नऊ जनावरे अर्जदाराचे ताब्यात परत मिळणेकरीता दाखल केला आहे.

२) अर्जदाराने असे कथन केले की, सदर जनावरे ही पोलिसांनी केवळ संशयावरुन व गैरसमजुतीतून जप्त केली आहेत त्यामुळे अर्जदारास विनाकारण आर्थिक व मानसिक त्रास होत आहे. सदर गुन्ह्याचे दोषारोपपत्र येवुन चौकशी होण्यास बराचसा कालावधी लागणार असल्याने तोपावेतो सदर जनावरे ही गोशाळेत ठेवल्यास जनावरांचे विनाकारण हाल होतील व अर्जदारासही त्यांचा विनाकारण खर्च सोसावा लागेल. सदर जनावरे ही केसचा निकाल लागेपावेतो अर्जदाराच्या ताब्यात दिल्यास अर्जदार त्यांची कोणासही विक्री अगर हस्तांतर करणार नाही. तसेच सदर जनावरांना नुकसान अगर इजा होईल असे कृत्य करणार नाही. सदर जनावरांना योग्य वागणुक देवुन त्यांचा चांगला सांभाळ करेल. तसेच अर्जदार हा गोशाळेचे नियमाप्रमाणे योग्य तो खर्च देण्यास तयार आहे. करीता सदर जप्त जनावरे ही योग्य त्या अटी शर्तीवर योग्य त्या रकमेचा बॉण्ड घेऊन अर्जदारास परत देण्यात यावे अशी विनंती केली.

३) सदर अर्जावर सहाय्यक सरकारी अभियोक्ता, तपासी अंमलदार तसेच गोशाळा यांचे म्हणणे मागविले.

४) सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी निशाणी क्र.१४ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन असे कथन केले की, सदरचा अर्ज व त्यातील मजकुर खरा नाही.

गुन्हयातील जप्त जनावरे ही गंभीर गुन्हयात जप्त करण्यात आलेली असून तपास हा प्राथमिक स्तरावर आहे. अर्जदार यांनी जप्त जनावरे त्यांच्या मालकीची असल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही. अर्जदार यांनी जप्त जनावरे यांची कोणतीही काळजी घेतलेली नसून जनावरांना कोणतीही वैदयकीय सुविधा व चारा–पाण्याची सुविधा न पुरविता वाहतुक करतांना मिळून आलेले आहेत. जप्त जनावरे ही सुपुर्तनामावर सोडल्यास सदर जनावरांची कत्तल करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदरचा अर्ज रद्द करण्यात यावा अशी विनंती केली.

५) तपासी अंमलदार यांनी निशाणी क्र.११ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन सदर जनावरे अर्जदाराचे ताब्यात देण्यात येवु नये अशी हरकत घेतली.

६) गोशाळेतर्फे निशाणी क्र.१३ वर म्हणणे दाखल केले असुन त्यांनी सदर जप्त जनावरे ही पोलिसांनी पालन–पोषण करण्याकरीता त्यांच्याकडे जमा केली असुन सदर जनावरे ही अशक्त स्थितीत होती. सदर जनावरे ही अर्जदाराच्या ताब्यात दिली तर गोवंशाची कत्तल होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने सदरची जनावरे ही अर्जदाराच्या ताब्यात देवू नयेत अशी हरकत घेतली.

७) अर्ज, सहाय्यक सरकारी अभियोक्ता, तपासी अंमलदार व गोशाळा यांनी दाखल केलेले म्हणणे, त्यांचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. अभियोग पक्षाच्या हकिकतीनुसार सदर जनावरे ही तपासी अधिकारी यांनी सदर गुन्हयात जप्त केलेली असून सदर जनावरे ही घटनास्थळी बाभळीच्या झाडाच्या आडोशाला चारा पाण्याची सोय न करता निर्दयतेने बांधून ठेवलेल्या अवस्थेत जप्त करण्यात आलेली आहेत. अभिलेखावर दाखल केलेल्या प्रथम खबरीचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी जनावरे ही कोंबून व दाटीवाटीने बांधलेल्या अवस्थेत मिळून आली. यावरुन प्रथमदर्शनी सदर जनावरे हे निष्काळजीपणाने ठेवलेली असल्याचे स्पष्ट होते. अर्जदार

यांनी सदर जप्त जनावरे ही मागणी करण्याकरिता सदर अर्ज दाखल केला. परंतु सदर जप्त जनावरे ही अर्जदार यांच्या मालकीची असल्याबाबत अभिलेखावर कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. अर्जदार यांनी सदर जनावरासंबंधी गणेश अर्पित शुगरकेन ट्रान्सपोर्ट प्रायव्हेट लिमिटेड, गणेशनगर यांनी दिनांक १३/०२/२०२६ रोजी दिलेल्या पत्राची प्रत दाखल केली. त्यावरुन सदर अर्जदार हे तोड कंत्राटदार असून त्यांना सदर जप्त जनावरे ही गणेशनगर कारखाना येथून भट्टीतांडा येथे वाहतुकीकरिता कुठलीही अडचण निर्माण होवु नये याकरिता परवाना दिलेला आहे. परंतु सदर जनावरे ही अर्जदार याच्या मालकीची असल्याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही. अर्जाचे अवलोकन केले असता अर्जदार यांचा व्यवसाय हा तोड कंत्राटदार असल्याचे नमुद केले असून सदर अर्जदार याच्याकडे शेती असल्याबाबत किंवा इतर कोणताही जनावरासंबंधी असलेला व्यवसाय करतात याबाबत कोणताही स्पष्ट पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही.अर्जदार यांच्याकडे जनावरे ही केवळ वाहतुक करुन भट्टीतांडा येथे पोहचविण्याकरिता ताब्यात दिल्याचे सदर पत्रावरुन दिसून येते आणि त्यामुळेच सदर जनावरे ही प्रथमदर्शनी अर्जदार यांची नसून केवळ त्यांच्या ताब्यात ही वाहतुक करुन एका ठिकाणावरुन दुस-या ठिकाणी नेण्याकरिता देण्यात आल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे जनावरे ही नेमके कोणत्या कारणास्तव अर्जदार यांच्या ताब्यात वाहतुकीकरिता देण्यात आले होते याबाबत सुध्दा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर सादर केलेला नसल्यामुळे सदर जप्त जनावरे ही अर्जदार हे कत्तल करण्याच्या उद्देशाने बाळगत होते ही बाब नाकारता येत नाही. अर्जदार यांनी अभिलेखावर कोणताही मालकीबाबत सबळ पुरावा दाखल केलेला नाही तसेच जनावरे ही अर्जदाराच्या ताब्यात कोणत्या कारणास्तव वाहतुकीकरिता होती याबाबत कोणताही ठोस पुरावा अभिलेखावर दाखल नसल्यामुळे अशा परिस्थितीत जप्त जनावरे ही अर्जदार यांच्या ताब्यात देणे न्यायोचित होणार नाही. त्यामुळे खालील आदेश पारित करण्यात

येतो.

## आदेश

सदरचा अर्ज नामंजुर करण्यात येतो.

JITENDRA DUDHRAM JADHAO Digitally signed by JITENDRA DUDHRAM JADHAO Date: 2026.03.18 17:25:30 +0530

ठिकाण : श्रीरामपुर.

दिनांक : १७/०३/२०२६.

**(जितेंद्र दु. जाधव)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, श्रीरामपुर.